<u>रे मु नं ४६६/२०१५ मधील नि.क्र.२९ वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दाखल करण्यात आला. त्यांचे कथन असे की, त्यांचा पुरावा नि.क्र.१ वरील दि.१६/०३/२०१७ च्या आदेशानुसार बंद करण्यात आला आहे. सदर आदेश हा खारीज करण्यात यावा. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर लेखी अर्जावर हरकत घेतली की, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा तसेच मंजूर केल्यास खर्च आदेशावर मंजूर करण्यात यावा. पुकारता वादी विधीज्ञ हजर व त्यांनी युक्तीवाद केला. प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर. एकंदरीत वादी विरूध्द पारीत झालेला पुरावा बंदचा आदेश खारीज करणे गरजेचे आहे. योग्य त्या पुराव्यानिशी त्यांचे म्हणणे मांडणेकामी वादी यांना संधी मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे झालेल्या विलंबापोटी खर्च रकमेवर अर्ज मंजूर करणे संयुक्तीक होईल म्हणून मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्च रक्कम रू.२००/- वर मंजूर करण्यात येतो.

२. सदरील खर्चाची रक्कम वादीने प्रतिवादी यांना पुढील तारखे पावेतो अथवा त्यापूर्वी दयावी.

(आ.सु.आलेवार)
दि.०४/०७/२०१७ २रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर
शेवगांव